Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। गुरुवार, दि. ०९ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ९१ । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

धुळेतील अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी कारवाई करा

(पान २ वर)



## अतिवृष्टीमुळे एचपीसीएल प्लांटला फटका; नागरिकांनी हात लावू नये – जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

# पाताळगंगा नदीत 3 हजार एलपीजी सिलेंडर गेले वाहून!

## नदीकाठच्या गावांना इशारा, सिलेंडर सापडल्यास प्रशासनाकडे तातडीने जमा करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

मुंबई । रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पनवेल तालुक्यातील चावणे येथील एचपीसीएल (HPCL) पाताळगंगा एलपीजी बॉटलिंग प्लांटमध्ये मोठी दुर्घटना घडली असून, पुराच्या पाण्याबरोबर सुमारे ३ हजार एलपीजी गॅस सिलेंडर पाताळगंगा नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या सिलेंडरपैकी काही भरलेले तर काही रिकामे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. संभाव्य धोका लक्षात घेता रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नागरिकांना अत्यंत सतर्क राहण्याचे आणि कोणत्याही परिस्थितीत नदीत किंवा नदीकाठावर आढळणाऱ्या सिलेंडरना हात न लावण्याचे आवाहन केले आहे.चावणे येथील अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील एचपीसीएलच्या प्लॉट क्रमांक ई-१/७ मधील एलपीजी बॉटलिंग प्लांटमध्ये अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शिरले. त्यानंतर प्लांट परिसरातील हजारो सिलेंडर पाण्याच्या वेगवान प्रवाहात वाहून गेले. त्यामुळे पाताळगंगा नदीच्या काठावरील अनेक गावांमध्ये हे सिलेंडर वाहून



येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, प्रशासनाने संपूर्ण परिसरात सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नागरिकांना उद्देशून स्पष्ट इशारा देताना सांगितले की, नदीत वाहून आलेल्या सिलेंडरमध्ये गॅस शिल्लक आहे की नाही, ते सुरक्षित स्थितीत आहेत की नाहीत, याची कोणतीही खात्री देता येत नाही. त्यामुळे उत्सुकतेपोटी किंवा वापराच्या उद्देशाने असे सिलेंडर उचलणे, हलविणे, उघडण्याचा प्रयत्न करणे किंवा घरी नेणे अत्यंत धोकादायक ठरू शकते. अशा प्रकारचे कृत्य जीवित आणि वित्तहानीचे कारण ठरू शकते, त्यामुळे नागरिकांनी कोणतीही जोखीम घेऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने नागरिकांसाठी विशेष सूचना जारी केल्या आहेत. नदीकाठावर किंवा पुराच्या पाण्यात सिलेंडर आढळल्यास तो स्वतःजवळ न ठेवता तातडीने एचपीसीएल कंपनी, जवळच्या एचपीसीएल वितरकाकडे, तहसीलदार कार्यालय (खालापूर), तहसीलदार कार्यालय (पेण) किंवा उपविभागीय अधिकारी, पेण यांच्या कार्यालयात जमा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच अशा सिलेंडरची माहिती त्वरित महसूल विभाग, स्थानिक पोलीस किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला देण्याच्या सूचनाही प्रशासनाने दिल्या आहेत.दरम्यान, मुसळधार पावसामुळे नदीपात्रातून विविध वस्तू वाहून येत असल्याने नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद वस्तूला हात लावू नये, सुरक्षित अंतर राखावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. सोशल मीडियावर या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, पाताळगंगा नदीतील पुराच्या भीषणतेची झलक त्यातून पाहायला मिळत आहे.

### अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

अफवांवर विश्वास न ठेवण्याचेही प्रशासनाने आवाहन केले असून, संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. एचपीसीएल, महसूल विभाग, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा यांच्या संयुक्त पथकांकडून नदीपात्रात वाहून गेलेल्या सिलेंडरचा शोध घेऊन ते सुरक्षितपणे परत मिळविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

---

✓ » Selected

## श्री अटल सागर महाराज यांचे उद्या नसीराबादकडे मंगल विहार

**नशिरबाद** | नसीराबाद : परम पूज्य संत शिरोमणी आचार्य श्री विद्यासागरजी महाराज यांचे परम शिष्य प.पू. मुनि श्री १०८ कुंथु सागरजी महाराज तसेच प.पू. क्षुल्लक श्री १०५ अटल सागरजी महाराज यांचे नसीराबादकडे मंगल विहार उद्या (दि. _) सकाळी संपन्न होणार आहे. विहारास सकाळी ८ वाजता श्री १००८ शांतिनाथ दिगंबर जैन मंदिर (लाल मंदिर) येथून प्रारंभ होईल. त्यापूर्वी मुनिश्रींची आहार चर्या खेडी रोडवरील कावेरी हॉटेलसमोरील श्री भावेश जैन यांच्या नवीन निवासस्थानी संपन्न होणार आहे. आहार चर्येनंतर सामयिक पूर्ण करून मुनि संघ नसीराबादच्या दिशेने प्रस्थान करणार आहे.दिगंबर जैन समाज, नसीराबादच्या वतीने सर्व जैन बांधव व भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून मुनिश्रींची आहार चर्या, विहाराचे दर्शन आणि आशीर्वादाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## भूमी अभिलेख कार्यालयातील कथित अनियमिततेची महसूलमंत्र्यांकडे तक्रार

### दोषींवर उच्चस्तरीय चौकशीची मागणी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव येथील सिटी सर्व्हे क्रमांक ८२२२/१ व ८२२२/२ या मिळकतींच्या पोटहिस्स्याची नोंद करताना कोणतेही सक्षम कायदेशीर आदेश नसताना क्षेत्रफळात बेकायदेशीर वाढ करून शासनाचा महसूल बुडविण्यात आल्याचा गंभीर आरोप करत समता सैनिक दलाचे राज्य संघटक विजय निकम यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकृत कागदपत्रांच्या आधारे ही तक्रार करण्यात आली असून, संबंधित प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, २१ ऑक्टोबर २०२४ रोजी अर्ज सादर करण्यात आल्यानंतर फेरफार क्रमांक ३१४३३ व ३१४३४ अन्वये ३ जानेवारी २०२५ रोजी सिटी सर्व्हे क्रमांक ८२२२/१ व ८२२२/२ या नवीन मिळकत पत्रिका तयार करण्यात आल्या. यामध्ये पूर्वीच्या मिळकत पत्रिकेतील एकूण क्षेत्रफळ १०५४.१० चौरस मीटर असताना, कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय १११.१३ चौरस मीटर (१,१९६.२० चौरस फूट) इतकी वाढ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कथित वाढीमुळे शासनाचे मुद्रांक शुल्क आणि इतर महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच, माहिती अधिकारातून प्राप्त झालेल्या नोंदींनुसार संपूर्ण प्रक्रिया एका दिवसात पूर्ण करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. १ जानेवारी २०२५ रोजी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी परिरक्षण भूमापन शाखा क्रमांक १ चे श्री. के. जे. भट यांनी अनुकूल टिप्पणी केली आणि नगर भूमापन अधिकारी श्री. पी. एस. पाटील यांनी कोणतीही सखोल पडताळणी न करता मंजुरी दिल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १५५ चा उल्लेख करत संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकारांचा गैरवापर केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासोबतच अशाच प्रकारच्या इतर फेरफारांचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

---

## ‘अमृत’ योजनेच्या खोदाईने नागरिकांचे हाल; रस्ते दुरुस्तीसाठी नगर परिषदेला निवेदन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद (जळगाव) :** एकीकडे अमृत योजनेच्या माध्यमातून विकासकामे केली जात असताना, दुसरीकडे याच कामांमुळे नशिराबादमधील गणेश नगर परिसरात नागरिकांना जीवघेण्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अवघ्या एक वर्षापूर्वी तयार केलेले रस्ते या योजनेच्या पाइपलाइनसाठी खोदण्यात आले, मात्र खोदकाम पूर्ण झाल्यानंतर ते रस्ते पूर्ववत दुरुस्त करण्यात प्रशासनाला आणि कंत्राटदाराला अपयश आले आहे. या गंभीर समस्येबाबत येथील रहिवासी देवेंद्र भंगाळे यांनी नशिराबाद नगर परिषदेला अधिकृत निवेदन दिले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने खोदलेल्या रस्त्यांवर चिखल आणि पाण्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे स्थानिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाच्या या निष्काळजीपणाकडे लक्ष वेधण्यासाठी देवेंद्र भंगाळे यांनी नगर परिषदेकडे तक्रार नोंदवली आहे. अपघातांचा धोका:* रस्त्यावरील चिखलामुळे दुचाकी घसरून पडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, नागरिकांना दुखापतींना




सामोरे जावे लागत आहे. शाळकरी मुलांची सुरक्षा:* जवळच ‘न्यू इंग्लिश स्कूल’ असल्याने शाळकरी मुले याच रस्त्यावरून ये-जा करतात. चिखलामुळे मुले घसरून पडत आहेत, ज्यामुळे त्यांच्या आरोग्याचा धोका:* रस्त्यावरील साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होत असून परिसरात साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. याबाबत यापूर्वीही स्थानिकांनी नगरपरिषद कार्यालयात तक्रारी केल्या होत्या, मात्र अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. भविष्यात एखादा मोठा अपघात घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी नशिराबाद नगरपरिषद प्रशासनाची राहील, असा इशारा देवेंद्र भंगाळे यांनी दिला आहे. नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करून रस्ते पुन्हा पक्के करावेत, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### नागरिकांसमोर गंभीर समस्या

अपघातांचा धोका:* रस्त्यावरील चिखलामुळे दुचाकी घसरून पडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, नागरिकांना दुखापतींना सामोरे जावे लागत आहे. शाळकरी मुलांची सुरक्षा:* जवळच ‘न्यू इंग्लिश स्कूल’ असल्याने शाळकरी मुले याच रस्त्यावरून ये-जा करतात. चिखलामुळे मुले घसरून पडत आहेत, ज्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. आरोग्याचा धोका:* रस्त्यावरील साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होत असून परिसरात साथीचे आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे.

---

## महसूल–पोलीस प्रशासनाचा धडाकेबाज छापा; आंतरराज्य गॅस काळाबाजार रॅकेटचा पर्दाफाश

### १०६ एलपीजी सिलेंडर, भारत पेट्रोलियमचा टँकर व तीन वाहने जप्त

जन सम्राट टाईम्स

**पिंपळनेर प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर–दहिवेल राष्ट्रीय महामार्ग परिसरात महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे केलेल्या धडक कारवाईत अवैध एलपीजी गॅस साठा करून व्यावसायिक हॉटेलांना पुरवठा करणाऱ्या आंतरराज्य रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे.

कारवाईदरम्यान आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून, भारत पेट्रोलियमचा गॅस टँकर, तीन चारचाकी वाहने, १०६ व्यावसायिक




गॅस सिलेंडर आणि गॅस भरण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. गुप्त माहितीच्या आधारे पिंपळनेर येथील अप्पर तहसीलदार अधिकार पेंढारकर यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाच्या पथकाने, तसेच पिंपळनेर पोलीस ठाण्याचे एपीआय नामदेव सहारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय संदीप संसारे यांच्या पथकाने संयुक्त छापा टाकला.

---

## समता सैनिक दलाची १५ जुलैला महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक

**जळगाव | प्रतिनिधी :** समता सैनिक दलाच्या जळगाव जिल्हा शाखेअंतर्गत जळगाव जिल्हा मध्य विभागाची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजता पद्मालय विश्रामगृह, जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. संघटना अधिक सक्षम करणे, समता सैनिक दलाच्या विचारांचा प्रसार करणे आणि जिल्हा मध्य विभागाची प्रभावी उभारणी करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश आहे. बैठकीस समता सैनिक दलाचे राज्याध्यक्ष धर्मभूषण बागुल हे मार्गदर्शन करणार असून, राज्य संघटक विजय निकम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

---

## बोरविहीर टोलवर कर्मचाऱ्यांची पोलिस पडताळणी करा!



जन सम्राट टाईम्स

**धुळे :** बोरविहीर टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांकडून वाहनचालक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांशी वारंवार दादागिरी, शिवीगाळ व मारहाणीचे प्रकार होत असल्याचा आरोप करत संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच सर्व कर्मचाऱ्यांची पोलिस पडताळणी (Police Verification) करण्यात यावी, अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नुकत्याच माजी आमदार प्रा. शरद पाटील यांच्याशी बोरविहीर टोल नाक्यावर झालेल्या वादाचा व्हिडिओ जाणीवपूर्वक व्हायरल करून त्यांची बदनामी करण्यात आली. संबंधित व्हिडिओ हेतुपुरस्सर प्रसारित करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. बोरविहीर टोल नाक्यावरील काही कर्मचारी गुंड प्रवृत्तीचे असून ते वाहनचालकांशी वारंवार वाद घालणे, दमदाटी करणे, शिवीगाळ करणे तसेच मारहाण करणे असे प्रकार करत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

टोल नाक्यावर निर्धारित नियमांचे पालन होत नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. फास्टॅग स्कॅनिंगला विलंब झाल्यास किंवा वाहन पांढऱ्या रेषेच्या पुढे गेल्यास विनाशुल्क मार्ग मोकळा करून देण्याचा नियम असतानाही वाहनचालकांकडून मनमानी पद्धतीने टोल वसूल केला जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. याशिवाय, टोल नाक्यावर कार्यरत प्रत्येक कर्मचाऱ्याची पोलिस पडताळणी तपासण्यात यावी, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेतून कमी करावे, पोलिस पडताळणी न केलेल्या कर्मचाऱ्यांनाही कामावरून हटवावे, तसेच सध्याच्या मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराचा करार रद्द करून नवीन एजन्सीची नियुक्ती करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनात माजी आमदार प्रा. शरद पाटील यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची आणि संबंधित प्रकरणात कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच संबंधित लेबर कॉन्ट्रॅक्टर व टोल व्यवस्थापनाची चौकशी करून कर्मचाऱ्यांना किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी (PF) आणि कामगार कायद्यांनुसार सुविधा दिल्या जात आहेत का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या निवेदनातील आरोपांवर संबंधित टोल व्यवस्थापन किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

---


जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# जिल्हा बँक शिपाई भरतीत स्थानिकांना 100% प्राधान्य

## भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाल्यास संचालक मंडळावर कारवाईचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील चतुर्थ श्रेणीतील शिपाई पदांच्या भरती प्रक्रियेत राज्य सरकारने महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाने जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार, यापुढे शिपाई भरतीची प्रक्रिया पूर्णपणे ऑफलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून संबंधित जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांना १०० टक्के प्राधान्य दिले जाणार आहे. नवीन नियमांनुसार शिपाई पदासाठी लेखी परीक्षा अनुभवी व तज्ज्ञ संस्थेमार्फत घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेत लेखी परीक्षेला ७० गुण आणि मुलाखतीला ३० गुण असे एकूण १०० गुण निश्चित करण्यात आले आहेत. उमेदवारासाठी किमान शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण ठेवण्यात आली असून, शैक्षणिक पात्रता, लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील कामगिरी या तीनही घटकांना महत्त्व दिले जाणार आहे. भरती प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार आढळल्यास संबंधित बँकेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही सरकारने दिला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका शेतकऱ्यांना पीक कर्जासह विविध वित्तीय सेवा पुरवत असल्याने, कर्मचारी भरती स्थानिक पातळीवर पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने व्हावी, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. यापूर्वी २२ जून




रोजी जारी करण्यात आलेले परिपत्रक रद्द करून सुधारित नियम लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रत्येक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्वतः ऑफलाइन पद्धतीने भरती प्रक्रिया राबविणार आहे. त्यामुळे गैरप्रकारांना आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सरकारच्या स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या धोरणानुसार, संबंधित जिल्ह्यात आवश्यक संख्येने पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यासच उर्वरित पदे जिल्ह्याबाहेरील उमेदवारांमधून भरता येणार आहेत. मात्र, प्रथम प्राधान्य स्थानिक उमेदवारांनाच देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील बेरोजगार युवकांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, तसेच भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उमेदवारांनी संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या अधिकृत सूचनांवर नियमित लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नवीन उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार

सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाने जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार, यापुढे शिपाई भरतीची प्रक्रिया पूर्णपणे ऑफलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून संबंधित जिल्ह्यातील स्थानिक उमेदवारांना १०० टक्के प्राधान्य दिले जाणार आहे. नवीन नियमांनुसार शिपाई पदासाठी लेखी परीक्षा अनुभवी व तज्ज्ञ संस्थेमार्फत घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. भरती प्रक्रियेत लेखी परीक्षेला ७० गुण आणि मुलाखतीला ३० गुण असे एकूण १०० गुण निश्चित करण्यात आले आहेत. उमेदवारासाठी किमान शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण ठेवण्यात आली असून, शैक्षणिक पात्रता, लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील कामगिरी या तीनही घटकांना महत्त्व दिले जाणार आहे. भरती प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार आढळल्यास संबंधित बँकेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही सरकारने दिला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका शेतकऱ्यांना पीक कर्जासह विविध वित्तीय सेवा पुरवत असल्याने, कर्मचारी भरती स्थानिक पातळीवर पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने व्हावी, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे. यापूर्वी २२ जून रोजी जारी करण्यात आलेले परिपत्रक रद्द करून सुधारित नियम लागू करण्यात आले आहेत.

# विनोद तावडे–एकनाथ खडसे भेटीने राजकीय चर्चांना उधाण; भाजपमध्ये घरवापसीच्या चर्चांना पुन्हा हवा!

## मुंबईतील भेटीचा फोटो व्हायरल; ‘राजकीय चर्चा झाली नाही

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार एकनाथराव खडसे आणि भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांची मुंबईतील भेट झाल्याचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर खडसे यांच्या भाजपमधील संभाव्य घरवापसीच्या चर्चांना पुन्हा वेग आला आहे. उत्तर महाराष्ट्रात भाजपचा जनाधार वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे ओबीसी नेते म्हणून एकनाथ खडसे यांची ओळख आहे. मात्र, भोसरी जमीन प्रकरण आणि तत्कालीन भाजप नेतृत्वाशी झालेल्या मतभेदांनंतर त्यांनी भाजप सोडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना विधान परिषदेवर संधीही देण्यात आली. लोकसभा निवडणुकीपासूनच खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण आले होते. केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा झाल्याच्या बातम्याही समोर आल्या होत्या. अशातच भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी खडसे यांच्या मुंबईतील निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात नव्या तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. उत्तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात असताना, केंद्रीय नेतृत्व खडसेंना




पुन्हा भाजपमध्ये आणण्यास इच्छुक असल्याच्या चर्चाही रंगू लागल्या आहेत. मात्र, या सर्व चर्चांवर स्वतः एकनाथ खडसे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी भेट झाल्याची पुष्टी करताना कोणतीही राजकीय चर्चा झालेली नसल्याचे स्पष्ट केले. खडसे म्हणाले, "विनोद तावडे हे केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांची भेट घेण्यासाठी माझ्या मुंबईतील निवासस्थानी आले होते. त्यावेळी त्यांनी सदिच्छा भेट म्हणून माझी आणि माझ्या प्रकृतीची विचारपूस केली. आमच्यात केवळ वैयक्तिक स्वरूपाच्या गप्पा झाल्या, कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही." खडसे यांच्या स्पष्टीकरणानंतरही त्यांच्या आगामी राजकीय भूमिकेबाबतची उत्सुकता कायम असून, पुढील काळात ते कोणता निर्णय घेतात, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### नव्या तर्क-वितर्कांना सुरुवात

भोसरी जमीन प्रकरण आणि तत्कालीन भाजप नेतृत्वाशी झालेल्या मतभेदांनंतर त्यांनी भाजप सोडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना विधान परिषदेवर संधीही देण्यात आली. लोकसभा निवडणुकीपासूनच खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण आले होते. केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा झाल्याच्या बातम्याही समोर आल्या होत्या. अशातच भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे यांनी खडसे यांच्या मुंबईतील निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात नव्या तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. उत्तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात असताना, केंद्रीय नेतृत्व खडसेंना पुन्हा भाजपमध्ये आणण्यास इच्छुक असल्याच्या चर्चाही रंगू लागल्या आहेत. मात्र, या सर्व चर्चांवर स्वतः एकनाथ खडसे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी भेट झाल्याची पुष्टी करताना कोणतीही राजकीय चर्चा झालेली नसल्याचे स्पष्ट केले.

## बारापत्थर–चाळीसगाव रोडवरील जीवघेण्या खड्ड्यांचा अनोखा निषेध

### तरुणाने खड्ड्यातील पाण्यातच केली आंघोळ

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे शहरातील अत्यंत वर्दळीचा बारापत्थर ते चाळीसगाव रोड या मार्गावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक वेळा तक्रारी व निवेदने देऊनही रस्ता दुरुस्त न झाल्याने एका तरुणाने खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बसून आंघोळ करत अनोख्या पद्धतीने महापालिका प्रशासनाचा निषेध नोंदवला. सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र गायकवाड यांनी या रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्याबाबत महापालिका प्रशासनाला अनेक वेळा निवेदने दिल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्याने संतप्त झालेल्या तरुणाने लक्षवेधी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

खड्ड्यातील पाण्यात बसून आंघोळ करत त्याने महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार



घोषणाबाजी केली. या अनोख्या आंदोलनामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनधारकांचे आणि नागरिकांचे लक्ष वेधले गेले. गेल्या अनेक महिन्यांपासून या मार्गावर मोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचल्याने त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी अनेक दुचाकीस्वार आणि वाहनधारक अपघातग्रस्त झाल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. या जीवघेण्या परिस्थितीकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. रस्ता तात्काळ दुरुस्त न झाल्यास आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनानंतर महापालिका प्रशासन खड्डे बुजविण्यासाठी तातडीने पावले उचलते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## रेल्वे भुयारी मार्गावर गुटखा तस्कर जेरबंद

### पाचोरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी :** पाचोरा शहरात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात पाचोरा पोलिसांनी पुन्हा एकदा धडक कारवाई करत एका संशयिताला ताब्यात घेत ६ हजार ७८० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूचा साठा जप्त केला. या कारवाईमुळे शहरातील अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवार (दि. ५ जुलै २०२६) रोजी सायंकाळी पोलीस कॉन्स्टेबल श्रीराम अनिल शिंपी व पोलीस कॉन्स्टेबल राहुल काशिनाथ शिंपी हे गुन्हे प्रतिबंधक गस्त घालत असताना रेल्वे भुयारी मार्गाजवळ, छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाठीवर काळी बॅग घेतलेला एक संशयित इसम आढळून आला. संशय आल्याने पोलिसांनी त्याला अडवून चौकशी केली असता त्याने आपले नाव सैय्यद सैफ अली सैय्यद अकबर अली (वय २६, रा. इमलीपुरा, जाम मोहल्ला, नॅशनल गर्ल्स शाळेजवळ, भुसावळ) असे सांगितले. बॅगेबाबत समाधानकारक माहिती न दिल्याने पोलिसांनी झडती घेतली असता त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला केसरयुक्त विमल पान मसाला व व्ही-१ तंबाखूचा साठा आढळून आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पंचांच्या उपस्थितीत ई-साक्ष ॲपद्वारे



पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त यांनी राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधित सुपारी व तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादन, साठा, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर बंदी घातलेली असतानाही संबंधित इसम हा विक्रीच्या उद्देशाने हा साठा बाळगत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गुटखा विक्रीच्या साखळीवर आघात

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल राहुल काशिनाथ शिंपी करीत आहेत. या कारवाईमुळे शहरातील अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.पाचोरा पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरातील अवैध गुटखा विक्रीच्या साखळीवर मोठा आघात बसला असून, प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## बांधकाम विभागाचे दोन अभियंते एसीबीच्या जाळ्यात

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** कामाचे मंजूर बिल काढून देण्यासाठी टक्केवारीच्या स्वरूपात लाचेची मागणी करणाऱ्या जिल्हा परिषद चाळीसगाव बांधकाम विभागातील दोन अभियंत्यांना धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) पथकाने सापळा रचून ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. या कारवाईमुळे शासकीय कार्यालयांमधील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, यशार्थ पांडुरंग निनावे (उपविभागीय अभियंता, वर्ग-१) आणि कुलदीप गमे (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, चाळीसगाव) यांनी मंजूर कामाचे बिल काढून देण्यासाठी तक्रारदाराकडे लाचेची



मागणी केली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर धुळे एसीबीच्या पथकाने सापळा रचला. चाळीसगाव बांधकाम विभागातील दोन अभियंत्यांना धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) पथकाने सापळा रचून ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. त्यामध्ये दोन्ही आरोपी ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ जाळ्यात अडकले. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## गुन्हेगारांवर कठोर कारवाई; राहुलकुमार पवार यांच्या एका वर्षाच्या कारकीर्दीची दमदार छाप

### शस्त्र, गुटखा, गांजा, दारू व जुगार माफियांवर धडक कारवाया

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा (प्रतिनिधी):** पाचोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांनी ६ जुलै २०२५ रोजी पदभार स्वीकारल्यानंतर अवघ्या एका वर्षात गुन्हेगारीविरोधात आक्रमक आणि परिणामकारक कारवाया करत उल्लेखनीय कामगिरीची नोंद केली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत अवैध शस्त्र, गुटखा, गांजा, दारू आणि जुगार माफियांवर धडक कारवाया केल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटकांमध्ये मोठा वचक निर्माण झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील कामगिरीची दखल घेत पाचोरा पोलीस स्टेशनला 'उत्कृष्ट पोलीस स्टेशन पुरस्कार'ही प्राप्त झाला आहे. ६ जुलै २०२५ ते ६ जुलै २०२६ या कालावधीत पोलीस स्टेशनमध्ये एकूण ९१७ गुन्हे दाखल झाले. त्यापैकी ७९१ गुन्ह्यांची मुदतीत निर्गती करण्यात आली असून गुन्हे निर्गतीचे प्रमाण ८६.२५ टक्के इतके आहे. पोलीस स्टेशनचा अभिलेखही सुचीबद्ध व अद्ययावत ठेवण्यात आला आहे. अवैध शस्त्रविरोधी मोहिमेत २८ तलवारी, १ कोयता, ३ चाकू-सुरे, १ चॉपर, ७ गावठी पिस्टल आणि ११ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. तसेच अवैध गुटखा आणि अंमली पदार्थांवर मोठी कारवाई करत ६८ लाख ४८ हजार ४०० रुपयांचा गुटखा आणि ४ लाख २२ हजार ६२० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करून १५ लाख ६० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. बेपत्ता आणि पळवून नेलेल्या व्यक्तींच्या सुमारे ९० टक्के प्रकरणांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करत १४ इसमांविरुद्ध हद्दपारीचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून, त्यापैकी ८ इसमांना हद्दपार करण्यात आले आहे. उर्वरित प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयात प्रलंबित आहेत. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत २०६ गुन्हे दाखल करून १४ लाख ९५ हजार ९५३ रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. तसेच कलम ९३ अन्वये ५९ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. जुगारविरोधी मोहिमेत ७३ गुन्हे दाखल करण्यात आले. त्यापैकी ४२ प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा झाली असून १ लाख १५ हजार ७४३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एनडीपीएस कायद्यानुसार २०२५ पासून आतापर्यंत ३१ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ३० गुन्हे अंमली पदार्थ सेवनाशी संबंधित आहेत. या प्रकरणांपैकी १२ प्रकरणांमध्ये आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी, गुन्हेगारीविरोधातील सातत्यपूर्ण मोहिमा आणि कठोर कायदेशीर कारवाईमुळे पाचोरा शहर व परिसरात सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली असून गुन्हेगारांवर पोलिसांचा प्रभावी वचक निर्माण झाल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## BLO सहाय्यक नियुक्त्या रद्द करण्याची मागणी

### राज्य अंगणवाडी कर्मचारी समितीचे भुसावळ प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यावर त्यांच्या मूळ जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त टाकण्यात आलेल्या BLO (Booth Level Officer) सहाय्यक पदाच्या नियुक्त्या तातडीने रद्द कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने भुसावळ प्रांताधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्याकडून मतदार यादी



विशेष पुनर्निरीक्षण तसेच BLO सहाय्यक म्हणून अतिरिक्त कामे करून घेतली जात आहेत. मात्र, विविध शासन निर्णय आणि संबंधित विभागाच्या निर्देशांनुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून अशा प्रकारची योजना बाह्य कामे करून घेऊ नयेत, असे स्पष्ट नमूद असतानाही स्थानिक स्तरावर परस्पर नियुक्त्या करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. समितीच्या मते, अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर वाढत्या अतिरिक्त कामाच्या ओझ्यामुळे केंद्रांतील नियमित कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे. परिणामी बालकांचे पोषण, आरोग्य सेवा, गर्भवती व स्तनदा मातांना दिल्या जाणाऱ्या सेवांवरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून BLO सहाय्यकांच्या नियुक्त्या रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी समन्वय समितीचे राज्य निमंत्रक रामकृष्ण बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख चेतना गवळी यांच्या नेतृत्वाखाली प्रतिभा चौधरी, रत्ना वाघ, मनीषा बारी, वैशाली तेलंग्रे, रेखा सरोदे यांच्यासह मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या.

## धुळेतील अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी कारवाई करा

### विशेष स्कॉड स्थापन करण्याची मागणी




जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे शहरातील वाढते अवैध धंदे, गुंडगिरी, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि बिघडत चाललेली कायदा-सुव्यवस्था याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवासेनेचे राज्य सहसचिव ॲड. पंकज गोरे यांनी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी विशेष स्कॉड स्थापन करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. निवेदनात धुळे शहरात सट्टा, पत्त्यांचे क्लब, अवैध दारू अड्डे यांसारखे अवैध व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी जुगार, सट्टा आणि इतर व्यसनांच्या विळख्यात अडकत असून त्याचे गंभीर सामाजिक परिणाम होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. ॲड. गोरे यांनी यापूर्वीही तत्कालीन पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय केराळे यांच्याकडे याच संदर्भात निवेदन दिले होते. मात्र, त्यानंतर तत्कालीन पोलीस महानिरीक्षक आणि धुळे जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांची बदली झाल्याने अपेक्षित कारवाई होऊ शकली नसल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. गुन्हेगारांवर विशेष नजर ठेवण्याची मागणी गंभीर गुन्ह्यांतील आरोपी जामिनावर सुटल्यानंतर पुन्हा गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी होत असल्याचा आरोप करत अशा आरोपींवर विशेष लक्ष ठेवावे, त्यांची नियमित तपासणी करावी, गुंडांची परेड घेऊन त्यांना तंबी द्यावी तसेच जामिनाच्या अटींचे उल्लंघन करणाऱ्यांचा जामीन रद्द करण्यासाठी प्रक्रिया राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सोशल मीडियावर निर्बंधाची मागणी सोशल मीडियावर काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून दहशत निर्माण करणारे व्हिडिओ, हिंसक गाणी आणि आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित केल्या जात असल्याचा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

गंभीर गुन्ह्यातील आरोपींच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक नियमावली तयार करावी किंवा निर्बंध घालावेत, अशीही मागणी करण्यात आली. महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे शाळा, महाविद्यालये आणि गर्दीच्या ठिकाणी दामिनी पथक अधिक सक्रिय करावे, छेडछाडीच्या घटनांवर कठोर कारवाई करावी आणि महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## दै.जनसम्राट टाईम्सच्या वृत्ताची दखल; पहाण रस्त्याच्या कामाला सुरुवात

### तलाठी कार्यालयासमोरील पाणी साचण्याच्या समस्येवर उपाययोजना; सिमेंटचे पाईप दाखल

जन सम्राट टाईम्स

**पहाण । प्रतिनिधी:** पाचोरा तालुक्यातील पहाण गावातील विविध समस्यांकडे लक्ष वेधणाऱ्या दैनिक जनसम्राट टाईम्सच्या वृत्ताची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेजवळील तलाठी कार्यालयासमोर पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. याबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्तानंतर प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. तलाठी कार्यालयासमोरील पाणी निचरा करण्यासाठी आवश्यक सिमेंटचे पाईप घटनास्थळी दाखल झाले असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

तसेच पहाण गावातील बल्लीवरील रस्त्याच्या प्रलंबित समस्येवरही प्रशासनाने लक्ष केंद्रित केले असून, रस्त्याचे काम लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या कामामुळे गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, पावसाळ्यात निर्माण होणारी गैरसोय दूर



होणार आहे. प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेबद्दल आणि तातडीने कार्यवाही केल्याबद्दल पहाण ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. या विकासकामासाठी सहकार्य करणारे संबंधित प्रशासन, अधिकारी तसेच शीतल कन्स्ट्रक्शन यांच्या संपूर्ण टीमचे पहाण ग्रामस्थांनी आभार मानले आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून अशीच विकासकामे वेगाने पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

### नागरिकांना मोठा दिलासा मिळणार

तलाठी कार्यालयासमोरील पाणी निचरा करण्यासाठी आवश्यक सिमेंटचे पाईप घटनास्थळी दाखल झाले असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. तसेच पहाण गावातील बल्लीवरील रस्त्याच्या प्रलंबित समस्येवरही प्रशासनाने लक्ष केंद्रित केले असून, रस्त्याचे काम लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या कामामुळे गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, पावसाळ्यात निर्माण होणारी गैरसोय दूर होणार आहे. प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेबद्दल आणि तातडीने कार्यवाही केल्याबद्दल पहाण ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306